# नियमित दिवाणी दावा क्र.७८०/२०२० मधील

# निशाणी २५ खालील आदेश

(शरीफा मुल्ला वगैरे वि. आलमशहा संदे वगैरे)

(CNR No.MHSN150063012020)

प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत हुकुम रद्द होऊन दाव्याकामी कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी केलेला आहे.

(२) वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. यातील प्रतिवादी यांना कायद्याचे ज्ञान नसलेने व कायद्यातील तरतुदी माहीत नसलेने व वेळेत कागदपत्रे न मिळालेने तसेच सदर प्रतिवादी हे काही दिवस कामानिमित्त परगावी गेले असलेने त्यांना वेळेत कैफियत देता आली नाही. त्यांनी मुद्दामपणे त्यास विलंब केलेला नाही. तरी प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला विनाकैफियतचा हुकुम रद्द करणेचा आदेश व्हावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

(३) वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी निशाणी २७ वर म्हणणे सादर केले असून प्रतिवादी यांनी अर्जात नमूद केलेले कारण योग्य व पुरेसे नसून त्यांनी निष्काळजीपणाने जाणून-बुजून आजपावेतो कैफियत दिली नसल्याचे कथन करुन दि.१०.०३.२०१६ रोजी विना कैफियत आदेश होऊनही कैफियत दाखल करणेस पाच वर्षांहून अधिक विलंब केला आहे असे कथन करुन अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

(४) निशाणी २५ वरील अर्ज, त्यापुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व निशाणी २७ चे अर्जावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीला दाव्याचे कामी दि.१०.१२.२०१५ रोजी समन्सची बजावणी होऊनदेखील ते वेळेत कैफियत दाखल करु शकलेले नाहीत. प्रतिवादींनी याकामी वेळेत कैफियत दाखल केलेली नसून त्यास बराच विलंब केलेला आहे.

(५)	अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी हे दि.१७.१२.२०१५ रोजी हजर झाले आहेत. दि.२६.०४.२०१६ रोजी त्यांचे विरुध्द विना कैफियत हुकूम झाला आहे. दि.०९.०७.२०१८ रोजी वादी पुरावा सादर करत नसलेमुळे दावा निकाली काढणेबाबत आदेश पारित झाला आहे. त्यानंतर दि.२१.१२.२०१९ रोजी वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास नाही असा आदेश पारित आहे. तसेच साक्षीदार क्र.२ चा उलटतपास नाही असा आदेश दि.२३.०२.२०२१ रोजी झालेला आहे. सद्य स्थितीला दावा वादीतर्फे साक्षीदार क्र.३ देणेवर नेमण्यात आले आहे.

(६)	मार्च २०२० पासून कोरोना महामारीमुळे कोर्टाचे कामकाज अनियमित सुरु होते. दि.०७.०९.२०२१ रोजी कोर्टाचे कामकाज सुरळीत सुरु झाले आहे. सदरचा अर्ज हा दि.२०.१२.२०२१ रोजी दिलेला आहे. परंतु, सन २०१६ पासून सन २०२० पर्यंतचा विलंबाचा कालावधी निश्चितच जास्त आहे. परंतु, नैसर्गिक न्याय हिताचे दृष्टीने प्रतिवादींना एक शेवटची संधी देणे न्यायाचे वाटते. दाव्याचे स्वरुप विचारात घेता प्रतिवादींची कैफियत रेकॉर्डवर घेण्यास नकार दिला तर निश्चितच प्रतिवादी यांचे अपरिमित असे नुकसान होण्याची शक्यता आहे. याउलट कैफियत आल्यास वाद विषयाचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होणार आहे. परंतु, प्रतिवादींमुळे मुळ दाव्याचे कामकाज लांबलेले आहे. त्यामुळे, विलंबाचा कालावधी विचारात घेता सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी वादी यांना र.रु.२०००/- इतका खर्च देणेचे अटीवर मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा निशाणी २५ वरील अर्ज त्यांनी र.रु.२०००/- इतका खर्च वादींना देणेचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

DEEPALI SHIVAJI CHOTHE
Digitally signed by DEEPALI SHIVAJI CHOTHE
Date: 2022.03.10 17:48:27 +0530

विटा.
दि.१०.०३.२०२२.

(दीपाली शिवाजी चोथे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा, जि.सांगली.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.V. Gaikwad |
| Name of the Court | :- | Smt. Deepali S. Chothe,<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 10.03.2022 |
| Order signed by P.O. on | :- | 10.03.2022 |
| Order uploaded on | :- | 10.03.2022. |